# भारतीय संविधान गौरव महोत्सव

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलडाणा येथे दिनांक १३/२/२०२५ ते २८/२/२०२५ दरम्यान क्रीडा स्पर्धा, मराठी भाषा पंधरवाडा व भारतीय संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.या निमित्त विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानावर आधारित पोवाडा व विविध कार्यक्रम सादर केले.भाषण स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,बचाव स्पर्धा,उत्स्फूर्त भाषण स्पर्धा,काव्य वाचन, एकांकिका ,एकपात्री प्रयोग,देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

दिनांक :22/२/२०२५ ला भाषण स्पर्धा - भारतीय संविधान

दिनांक :2४/२/२०२५ ला वक्तृत्व स्पर्धा - भारतीय संविधानाचे महत्व

दिनांक :2५/२/२०२५ ला एकपात्री प्रयोग स्पर्धा – (थीम ) भारतीय संविधान गौरव

दिनांक :2७ /२/२०२५ व २८/२/२०२५ वार्षिक स्नेहसंमेलन-२०२४-२५ आयोजित करण्यात आले या स्नेहसंमेलनाची मुख्य संकल्पना **मराठी भाषा पंधरवाडा व भारतीय संविधान गौरव महोत्सव** ही होती या स्नेहसंमेलनात बीएड व एमएड प्रशिक्षानार्थ्यानी भारतीय संविधानावर आधारित विविध कार्यक्रम सादर केले त्याचे छायाचित्र पुढील प्रमाणे –

दिव्य मराठी बुलडाणा 02-03-2025


सिटी कनेक्ट — बुलडाणा, रविवार, २ मार्च २०२५ | ४

**नाटिका, गीत, पोवाड्यातून वार्षिक स्नेहसंमेलनात संविधानाचा जागर**

**बुलढाणा** | भारतीय संविधान महोत्सव शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात भारतीय संविधान महोत्सव या संकल्पनेवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.छात्र अध्यापकांनी गोंडी आदिवासी नृत्य ,कोळी नृत्य , कथ्थक नृत्य भरतनाट्यम यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.संविधानावर आधारित व संविधानाची माहिती सर्वसामान्यांना व्हावी यावर आधारित नाटिका. गीत, पोवाडा सादर करून उपस्थितांना संविधानात असलेल्या विविध कलमांची माहिती करून दिली. यादरम्यान विद्यार्थी उपस्थित होते.

छाया: रविकीरण टाकळकर







## स्नेहसंमेलन क्षणचित्रे



सायं दैनिक
विदर्भ दर्पण

# भारतीय संविधान महोत्सव



**बुलडाणा :** शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात भारतीय संविधान महोत्सव या संकल्पनेवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. छात्र अध्यापकांनी गोंडी आदिवासी नृत्य, कोळी नृत्य, कथ्थक नृत्य भरतनाट्यम यासह विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. संविधानावर आधारित व संविधानाची माहिती सर्वसामान्यांना व्हावी यावर आधारित नाटिका. गीत, पोवाडा सादर करून उपस्थितांना संविधानात असलेल्या विविध कलमांची माहिती करून दिली. (छायाचित्र–रविकिरण टाकळकर)

पुण्य नगरी

# शासकीय अध्यापक विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम

**बुलढाणा,** दि. १ (प्रतिनिधी)



शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात भारतीय संविधान महोत्सव या संकल्पनेवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

यावेळी छात्र अध्यापकांनी गोंडी आदिवासी नृत्य, कोळी नृत्य, कथ्थक नृत्य भरतनाट्यमसह विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. संविधानावर आधारित व संविधानाची माहिती सर्वसामान्यांना व्हावी यावर आधारित नाटिका, गीत, पोवाडा सादर करून उपस्थितांना संविधानात असलेल्या विविध कलमांची माहिती करून दिली.

Buldhana Edition
Mar 2, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com



वेशभूषा स्पर्धा  -विविधतेत एकता




उस्फुर्त भाषण स्पर्धा – भारतीय संविधान







**क्रीडा स्पर्धा -२०२४-२५**

मस्ट READ

# संविधानाचा गौरव महोत्सव!

## भावनांचा विचार करून मुक्तता साधा-निकम

लोकमत न्यूज नेटवर्क

**बुलढाणा :** आपल्याला भारतीय संविधानाने विविध भावना जपण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. मात्र, आपण दोन गोष्टींमुळे बंधनात आहोत. एक म्हणजे हातातील मोबाइल आणि दुसरे म्हणजे स्वतःच्या भावना. या बंधनातून मुक्त होण्यासाठी कोणत्याही वेगळ्या स्वातंत्र्याची किंवा लढा उभारण्याची गरज नाही. हा लढा आपल्यालाच स्वतःशी लढायचा आहे आणि त्यासाठी 'भावनिक बुद्धिमत्ता' विकसित करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन भावनिक बुद्धिमत्ता समुपदेशक डॉ. वैशाली निकम यांनी केले.

शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलढाणा येथे भारतीय संविधानाचा गौरव महोत्सव आणि वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. २७ फेब्रुवारीला पार पडलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. एन. बी. चव्हाण होत्या. वैशाली निकम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात 'भारतीय संविधानाचे तंतोतंत पालन असे आवाहन केले.



## कार्यक्रमाला प्रमुख मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमाला स्नेहसंमेलन सांस्कृतिक प्रभारी प्रा. रविकिरण मोरे, प्रा. डॉ. हर्षानंद खोब्रागडे, प्रा. डॉ. अनिल वरघट, प्रा. डॉ. सुनील खडसे, प्रा. प्रेरणा श्रीनाथ, प्रा. भावना काळे, प्रा. प्रकाश डोंगरदिवे, प्रा. राहुल हिवाळे, प्रा. अनिल ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**कार्यक्रमाचे प्रास्ताविक किरण तायडे यांनी, सूत्रसंचालन प्रदीप गवई, राजरत्न गव्हांदे, पूजा कोल्हे, सुषमा राठोड यांनी केले. अक्षय जाधव यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी प्राचार्यांच्या मार्गदर्शनात अध्यापक महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.**

## संविधान, नाट्य आणि संस्कृतीचा अनोखा संगम

विद्यार्थ्यांनी 'चवदार तळ्याचा सत्याग्रह', 'संविधानाचे मौलिक अधिकार' यांसारख्या विषयांवर प्रभावी नाटिका सादर केल्या. याशिवाय कोळी नृत्य, आदिवासी नृत्य आणि देशभक्तीपर नृत्य या सांस्कृतिक कार्यक्रमांनी संमेलन रंगतदार झाले.

## विद्यार्थ्यांचा प्रभावी पोवाडा

बीएडचे अभय झनके, हृषीकेश जाधव, हर्षल गवले, संकेत बोडके, हर्षवर्धन इंगळे, दीपिका कुलकर्णी, अंजली पांडे, भक्ती पवार, ऋतुजा चव्हाण, चंचल सित्रे या विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारिक पोवाडा सादर केला.